महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे
७०८, आरबी कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे-४११०३०.

**संपर्क क्रमांक** (०२०)२४४७८१२२ **ईमेल:** sqaafmh@maa.ac.in

जा.क्र. राशैसंप्रपम/मूल्यमापन/SQAAF/२०२६/188 दि. 15/04/2026

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व)
प्रशासनाधिकारी मनपा/नपा (सर्व)
शिक्षण निरीक्षक ,मुंबई(सर्व)

विषय : शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा (SQAAF) स्वयं मूल्यांकन २०२५-२६ बाबतची माहिती SQAAF ॲप मध्ये भरण्यास मुदतवाढ देणे बाबत.

संदर्भ :१. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२४/प्र.क्र.०९/एसडी-६ मंत्रालय मुंबई दि. १५ मार्च, २०२४(SSSA)

२. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२४/प्र.क्र.०९/एसडी-६ मंत्रालय मुंबई दि. १५ मार्च, २०२४(SQAAF)

३. मा. संचालक. SCERTM पुणे यांचे दि.०३ /०२/ २०२५ रोजीचे पत्र

४ .मा. संचालक. SCERTM पुणे यांचे दि.१७/०२/२०२६ रोजीचे पत्र

५.मा. संचालक. SCERTM पुणे यांचे दि.११ /०३/२०२६ रोजीचे पत्र

उपरोक्त संदर्भ क्र.१ नुसार राज्यातील सर्व शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे येथे राज्य शाळा मानक प्राधिकरण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. संदर्भ क्र. २ नुसार राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांसाठी शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखड्याची (SQAAF) निर्मिती करण्यात आलेली आहे. संदर्भ क्र.३ नुसार सन २०२४-२५ मधील स्वयं मूल्यांकन पूर्ण करण्यात आले आहे. संदर्भ क्र.४ नुसार सन २०२५-२०२६ मध्ये शाळांचे स्वयं-मूल्यांकन करण्यासाठी दि.२७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सर्व शाळांना पूर्व तयारीच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांसाठी विकसित करण्यात आलेल्या शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखड्याची (SQAAF) प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षणाधिकारी

(माध्यमिक) यांची असेल. संकेतस्थळावर सर्व शाळांची नोंदणी व स्वयं मूल्यांकन पूर्ण करून घेण्याची जबाबदारी प्राथमिक शाळांच्या व माध्यमिक शाळांच्या संदर्भात अनुक्रमे शिक्षणाधिकारी(प्राथमिक), शिक्षणाधिकारी(माध्यमिक) यांची राहील. शाळांना मूल्यांकना संदर्भात तसेच शाळा विकास आराखडा निर्मिती संदर्भात गरजेनुसार मार्गदर्शन करण्याची जबाबदारी प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांची राहील.

संदर्भ क्र ५ नुसार सन २०२५-२६ मध्ये शाळांचे स्वयं-मूल्यांकन पूर्ण करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्या maa.ac.in या वेबसाईटवरील SQAAF टॅबमध्ये स्वयं-मूल्यांकनासाठीची लिंक दि.१६ मार्च २०२६ ते दि.१५ एप्रिल२०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत उपलब्ध करून देण्यात आली होती. शिक्षणाधिकारी प्राथमिक/माध्यमिक यांनी मुदतवाढ देणे बाबत विनंती केली आहे.

सन २०२५-२६ मध्ये शाळांचे स्वयं-मूल्यांकन पूर्ण करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्या maa.ac.in या वेबसाईटवरील SQAAF टॅबमध्ये स्वयं-मूल्यांकनासाठीची लिंक मुदतवाढीसह दि.१ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ :०० वाजेपर्यंत उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सदरील SQAAF ॲप वर दिलेल्या मुदतीत माहिती भरणे बाबत आपल्या जिल्ह्यातील सर्व शाळांना ऑनलाइन / ऑफलाइन बैठकीचे आयोजन करून कळविण्यात यावे.

(मा. संचालक यांच्या मान्यतेनुसार.)

(डॉ. कमलादेवी आवटे)
सहसंचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

प्रत माहितीस्तव सविनय सादर :
१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण, मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, डॉ. ॲनी बेझंट मार्ग, पुणे
३. शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक),शिक्षण संचालनालय ,महाराष्ट्र राज्य, पुणे.